# मनसे सत्तेत आल्यास मशिदीवरील भोंगे दिसणार नाही!

## त्यांचे फतवे निघतात, आमच्या मतांचे काय? ■ सायंस्कोर मैदानावर राज ठाकरेंची पुन्हा गर्जना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** - आम्ही हिंदू म्हणून कधी एकत्रितपणे विचार करीत नाही. हिंदू फक्त दंगलीच्या वेळी असतो. नंतर तो स्वतऱ्च्या जातीचा होतो. आजच्या राजकीय लोकांना तेच हवे आहे. आता काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार आणि शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाला एकगठ्ठ मतदान करा, असे फतवे मुस्लीम मौलवींकडून काढले जात आहेत. आम्ही मात्र अजूनही विखुरलेले आहोत. मुस्लिमांच्या मतांसाठी बुळबुळीत सरकारे ठोस भूमिका घेताना दिसत नाहीत. पण, तुम्ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हाती सत्ता दिली, तर एकाही मशिदीवर भोंगा दिसणार नाही, असे वक्तव्य राज ठाकरे यांनी केले आहे.

अमरावतीचे मनसेचे उमेदवार पप्पू उर्फ मंगेश पाटील यांच्या प्रचारार्थ बुधवारी रात्री येथील सायन्सकोर मैदानावर आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी मंचावर अविनाश अभ्यंकर, अनिल शिदोरे, पंकज साबळे, उमेदवार मंगेश पाटील, अकोट मतदारसंघाचे उमेदवार कॅप्टन सुनील डोबाळे, अमरावती जिल्हाध्यक्ष राज पाटील, शहराध्यक्ष धीरज तायडे, प्रसिद्धी प्रमुख पवन सावरकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

राज ठाकरे म्हणाले, मशिदींवरचे भोंगे बंद झाले नाही, तर मशिदीसमोर हनुमान चालिसा पठण करण्याचा इशारा मनसेने दिला होता. त्यावेळी उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री होते. आम्ही आंदोलन केल्यानंतर भोंगे बंद झाले होते. पण, त्यावेळी मनसेच्या 17 हजार कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हे



दाखल करण्यात आले होते. ही कुणाची माणसे आहेत. कुणाला जपताहेत. मुंबईत समुद्रात अनधिकृतपणे एक मजार बांधण्यात येत होती. आम्ही ते उघड करताच एका रात्रीत ती पाडण्यात आली.

हिंमत कशी होते, या लोकांची. हे लोक रस्त्यावर येऊन नमाज पठण करतात. मुस्लिमांनी त्यांचा धर्म घरात ठेवावा. तो उंबरठा ओलांडून बाहेर यायला नको. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

### राजकमल चौकात जे झाले ते पुन्हा होवू नये - पप्पु पाटील

काँग्रेसचा खासदार निवडून आल्यावर राजकमल चौकात त्यांनी पिवळी माती उधळली, पाकीस्तानचे झेंडे फडकविले, एका महिलेचा अपमान केला. हे यानंतर होता कामा नये, याकरिता आम्ही आता एक मनसेच्या रुपाने सक्षम पक्ष आणि आमदार कसा निवडून आणू याकडे जनतेने लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन यावेळी पप्पु पाटील यांनी आपल्या भाषणातून यावेळी केले.



ते म्हणाले, उद्धव ठाकरेंचा विषय आधीच आटोपलेला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादीचे लोक दुखावले जाऊ नयेत, म्हणून उद्धव ठाकरे हे स्वतऱ्च्या वडिलांच्या नावासमोरील हिंदूहृदयसम्राट हे बिरूद काढून टाकतात.

मग उरले काय. ही मंडळी त्यांच्यासाठी काम करणार. सगळे त्यांच्यासाठी. मग तुमच्यासाठी उरले काय, असा सवाल राज ठाकरे यांनी केला. नवनीत राणा यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर मुस्लिमांनी रस्त्यावर येऊन जल्लोष केला. पाकिस्तानचे झेंडे नाचवत उत्सव साजरा केला. आम्हाला त्याचे काहीच वाटत नाही. आम्ही बाहेरून किती वेळ काम करायचे. एकवेळ सत्ता द्या, नाही सडकून काढले, तर म्हणा. परत यांची हिंमत होणार नाही, असे राज ठाकरे म्हणाले.

# बस खाली आल्याने दुचाकीस्वार पोलीस ठार

## गुरुकुंज मोझरी जवळील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, दि. 6-** गडचीरोली येथे जाणाऱ्या भरधाव एसटी बसखाली आल्याने दुचाकीस्वार पोलिस ठार झाल्याची घटना बुधवारी दुपारच्या सुमारास तिवसा येथील गुरुकुंज मोझरी रस्त्यावर घडली. संदीप देविदास चौधरी (40, रा. परतवाडा), असे मृतक पोलिस हवालदाराचे नाव आहे. संदिप चौधरी हे मोझरी येथे आयोजित उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेतील बंदोबस्ताचे कर्तव्य बजावण्यासाठी जात असतानाच हा अपघात घडला. या घटनेमुळे पोलिस विभागात शोककळा पसरली आहे.

चांदूर बाजार पोलिस ठाण्यात कार्यरत असणारे पोलिस हवालदार संदीप चौधरी हे बुधवारी मोझरी येथील महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचार सभेत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ येत असल्याने बंदोबस्ताचे कर्तव्य बजावण्यासाठी जात होते. दरम्यान काही वेळात परत येतो, असे त्यांनी सहकार्याला सांगून ते दुचाकीने निघून गेले. अशातच ते मोझरीजवळील रस्त्याने दुचाकीने जात असताना, अचानक अमरावतीवरून गडचिरोली जाणार्या एमएच 40 सीएम 5951 क्रमांकाच्या बससमोर त्यांच्या दुचाकी आली आणि दुचाकीस्वार संदीप देविदास चौधरी हे बसच्या चाकाखाली येऊन चिरडल्या गेले. त्यामुळे त्यांचा जागिच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळ गाठून संदीप चौधरी यांचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. या घटनेमुळे पोलिस विभागात शोककळा पसरली आहे. दरम्यान विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांच्यासह जयंत झाडे, स्वप्निल धनाड, जीवन वानखडे, योगेश ठाकरे आदी महामंडळाच्या अधिकार्यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनेचा पुढील तपास तिवसा पोलिस करीत आहेत.

# स्वतःचा गळा कापून आत्महत्येचा प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** - कौटुंबीक कारणावरून एका तरुणाने स्वताःच्या गळ्यावर धारदार शस्त्रांनी वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सुनील पुंडलिक इंगळे (45, रा.सिरसो, तालुका मूर्तिजापूर) असे जखमीचे नाव आहे. तो कवर नगर चौकाजवळ जखमी अवस्थेत पडून होता. सुदैवाने काही जणांचे लक्ष सुनिलवर गेले आणि पोलिसांनी त्याला उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

**कौटुंबीक वादातून उचलले पाऊल**

एक इसम हा जखमी अवस्थेत कवरनगर चौकाजवळील नाल्यात पडून असल्याची माहिती राजापेठ पोलिसांनी मिळाली होती. या माहितीवरून तात्काळ राजापेठ पोलीसांनी घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी एक इसम हा जखमी अवस्थेत दिसला. पोलिसांनी त्याला औषध उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी सुनिलची चौकशी केली असता, त्याने स्वतःच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार करून जखमी करून घेतल्याची माहिती राजापेठ पोलीसांना दिली. या घटनेच्या माहितीवरून डीसीपी गणेश शिंदे यांनीही जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन जखमीची भेट घेतली. यावेळी ठाणेदार पुनित कुलट, एपीआय नितेश देशमुख व डीबी स्कॉडचे टीम उपस्थित होते. डीसीपी शिंदे यांनी ठाणेदार यांच्याशी चर्चा करून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासून घेण्याचे सांगितले. या घटनेची माहिती सुनिलच्या कुटुंबीयांना देण्यात आली. त्यानंतर सुनिलचे नातेवाईक रुग्णालयात पोहोचले. त्यावेळी सुनिल हा दोन महिन्यापासून घरातून बाहेर असल्याची माहिती त्याच्या वडिलांनी पोलिसांना दिली आहे. कौटुंबीक तणावातून त्याने स्वतःच्या अंगावर जखम करून घेतल्याची माहिती पुढे आली.

# वरुड-मोर्शी मतदारसंघात चौरंगी लढत

## दोन्ही राष्ट्रवादी मैदानात मत विभाजनाचा दोन्ही बाजूला धसका

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.6 )-** मोर्शी विधानसभा मतदारसंघात एकूण 19 उमेदवार रिंगणात असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) व भारतीय जनता पार्टी या तीन उमेदवारांमध्ये मुख्य सामना रंगणार आहे, तर अपक्ष उमेदवाराची या लढतीला तिसरी किनार लाभल्याने चुरस आणखीनच वाढली आहे.

महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार या पक्षाच्या वतीने विद्यमान आमदार देवेंद्र भुयार दुसऱ्यांदा रिंगणात उतरले आहे. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गिरीश कराळे यांनी दंड थोपटले आहे. तर भाजपाचे उमेदवार चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी या निवडणुकीत उडी घेत महायुतीला घरचा आहेर दिला आहे. या तीन प्रमुख उमेदवारांमध्ये तिरंगी लढत होणार आहे. तर माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांचे पुत्र विक्रम



ठाकरे हे सुध्दा अपक्ष उमेदवार म्हणून या तिघांच्याही नाकी नऊ आणण्याकरिता तयार आहेत. त्यामुळे हा सामना तिरंगी नसून चौरंगी होणार असल्याचे दिसत आहे. गेल्या निवडणुकीत माळी समाजाचा मोठा वर्ग असलेल्या या मतदारसंघात भाजपाने उमेदवारी न दिल्यामुळे त्यांना हार पत्करावी लागली. त्यामूळे या वेळेला माळी समाजाचे उमेदवार म्हणून भाजपाने चंदु उर्फ उमेश यावलकर यांना उमेदवारी दिल्याची चर्चा मतदारसंघात आहे. गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार व काँग्रेस-राष्ट्रवादी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार या दोघांमध्येच लढाई काट्याची झाली होती, तेव्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे देवेंद्र भुयार विजयी झाले होते. आता मात्र ती परिस्थिती राहिलेली नाही. या निवडणुकीत चारही उमेदवार कस लावून उभे आहेत. त्यामुळे निवडून येणार तरी कोण असा प्रश्न सर्वसामान्य मतदारांना पडलेला आहे. अशा वेळी जातीपातीचे समीकरण लावून विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार हे सांगणे सध्या तरी कठीण असले तरी पक्षाचीच बाजू भक्कम आहे, एवढे मात्र खरे. यावेळी महाविकास आघाडीने गिरीश कराळे व महायुतीतील अजित दादा यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने देवेंद्र भुयार तसेच अपक्ष उमेदवार विक्रम ठाकरे हे तीनही उमेदवार एकाच समाजाचे असल्यामुळे भाजपाने चंदू उर्फ उमेश यावलकर या माळी समाजाच्या नेत्याला उमेदवारी दिल्यामुळे समीकरण बदलू शकते अशी चर्चा आहे.

# विवाहितेचा छळ

**अमरावती** - येवदा पोलिस ठाण्याच्या हद्दीत माहेरी असलेल्या महिलेची सासरी कामवाल्या बाईशी तुलना करीत तिचा अनन्वित छळ करण्यात आला. तिला घराबाहेर काढण्यात आले. येवदा पोलिसांनी याप्रकरणी भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील कुर्हे पानाचे या गावातील सासरच्या मंडळीविरुद्ध 4 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये सचिन अनप्पा जाधव, सासरे अनप्पा सत्यभान जाधव, दिनेश पंडित पाटील, मनोज प्रकाश पाटील व दोन महिला यांचा समावेश आहे. 3 जून 2023 ते 25 मार्च 2024 दरम्यान हा छळ झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले. प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदारांच्या मार्गदर्शनात होत आहे.

# अचलपूर मतदारसंघात काँग्रेसची बुडती नौका?

## नेत्यांच्या हेकेखोरीचा कंटाळा, कार्यकर्त्यांकडून पक्षाला फारकत देण्याचे प्रमाण वाढले

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.6 )-** जिल्ह्यातील अत्यंत महत्वाचा मानला जात असलेल्या अचलपूर विधानसभा मतदारसंघात 'उपरसे टामटूम' दाखविला जात असलेला काँग्रेस पक्ष आतमधून चांगलाच पोखरल्या जात असल्याचे चित्र आहे. पक्षातील काही नेत्यांच्या हेकेखोरी धोरणाला कंटाळून कार्यकर्ता पक्षाशी फारकत घेत दुसऱ्या पक्षासोबत संसार थाटताना दिसत आहे. ऐन विधानसभा निवडणूकीमध्ये हा प्रकार सुरु असल्याने अचलपूर मतदारसंघात काँग्रेसची नौका बुडते की काय? अशी भीती उमेदवाराला सतावित आहे.

अचलपूर विधानसभा मतदार संघात काँग्रेस पक्षाची उत्तम बांधणी आहे. लोकसभा निवडणुकीत सुद्धा पक्षाची चांगली एकजूट दिसून आली. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे या कार्यात महत्वाचे योगदान नसले तरी एकंदरीत त्यांच्या हुकूमशाही वृत्तीमुळे काँग्रेस मधील स्वाभिमानी कार्यकर्त्यांची गोची झाल्याने पक्षातील कार्यकर्त्यांची नाराजी वाढलेली आहे. काँग्रेस मध्ये स्वाभिमानी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांपेक्षा हुजरेगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना जास्त मान दिला जात असल्याचा आरोप होत आहे. पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सर्वांसमोर पान उतारा करणे, ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडे संभ्रमाच्या नजरेने पाहणे, निवडणूक आली की घरगडी सारखे राबवायचे, कार्यकर्त्यांना कामगारांसारखी वागणूक द्यायची आणि निवडणूक पार पडली की कार्यकर्त्यांना साधे विचारायचे देखील नाही, उमेदवाराच्या अश्या स्वभावाला कंटाळून आम्ही बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षात जात असल्याचे काँग्रेस कार्यकर्ते सांगत आहेत. दोन दिवसांपूर्वी कुरळ पूर्णा, बोरगाव मोहना, बोपापुर, राजना, निरुळ, घाटलाडकी, करजगाव, शिरजगाव, परसोडा, चांदुर बाजार, शिरजगाव बंड, सर्फाबाद, भूगाव, बोरगाव, अचलपूर, परतवाडा तसेच अन्य गावातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी व महत्वाच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसला रामराम करत बच्चू कडू यांना जाहीर समर्थन दिले. आणखीनही कार्यकर्त्यांची गळती काँग्रेसला सहन करावी लागणार असल्याचे दिसत आहे.



### बबलू देशमुख हे पक्षाशी एकनिष्ठ नाही

गेली अनेक वर्षे काँग्रेसमध्ये मी निष्ठेने आणि स्वाभिमानाने काँग्रेसमध्ये काम करित आहे. परंतू यंदाच्या निवडणूकीत बबलू देशमुख विजयी होण्याकरिता पक्षाशी एकनिष्ठ नाहीत. ते अतिशय घाणेरडे राजकारण करित असल्याचा आरोप युवक काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष तसेच अनुसूचित जाती जमाती सेल चे चांदुर बाजार तालुका अध्यक्ष व माजी उपसरपंच शैलेश निरगुडे यांनी केला आहे. बच्चू कडू हे एकमेव नेते पूर्ण महाराष्ट्राला भारी आहेत आणि विशेष म्हणजे त्यांच्याकडे सर्वांनाच आदर मिळतो, इथे दिलेल्या शब्दाला किंमत आहे. म्हणूनच मी काँग्रेस सोडून प्रहार पक्षात प्रवेश घेतला असल्याचे ते म्हणाले.

### आम्ही आमचा सन्मान विकला नाही

सन्मान सर्वांना हवा असतो, मात्र बबलू देशमुख नेहमी हुकूमशाही भूमिका निभावतात. निवडणूक आली की दलित, मुस्लिम मतदारांचा वापर करायचा, त्यांचे मतदान कायम गृहीत धरायचे आणि निवडणूक झाली की त्यांना वाऱ्यावर सोडायचे. पद देतांना सुद्धा दलित आणि मुस्लिम कार्यकर्त्यांना नेहमीच उपेक्षित ठेवण्यात आले . त्यामुळे बबलू देशमुख यांच्या अश्या धोरणाला कंटाळून सर्व स्वाभिमानी काँग्रेस कार्यकर्त्यांनी आता काँग्रेस ला कायमची सोडचिठ्ठी दिली आहे. त्यांनाच नडणार आहे.

**जमीर, जमापूर,**
**चांदूर बाजार प्रहारमध्ये आलेले काँग्रेस कार्यकर्ता**

# प्रिती बंड यांची महाजनपुरा येथे प्रचार यात्रा

## छत्रपती शिवाजी महाराज यांचे दर्शन घेऊन प्रारंभ ▌प्रचारयात्रेला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.6 )** - बडनेरा विधानसभेच्या अपक्ष उमेदवार लोकनेते संजय बंड यांच्या पत्नी प्रिती बंड यांनी महाजनपुरा येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन सुरुवात केली. प्रभागातील नागरिकांनी प्रिती बंड यांचे जागोजागी औक्षवंत करुन जंगी स्वागत करत त्यांच्या विजयासाठी शुभेच्छा दिल्या. प्रिती बंड यांनी महाजनपुरा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन घेऊन हारार्पण केले. यावेळी प्रचार यात्रेला महाजनपुरा शिवाजी गेट पासून सुरुवात करून खदानपुरा, कांडलकर प्लॉट, मावदे वाडी, खोलापुरी गेट, हनुमाननगर, केवलेवाडी, परदेशीपुरा, दत्तुवाडी, आमले प्लॉट येथील नागरिकांशी संवाद साधत आपल्याला मोठ्या



मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. यावेळी 'प्रितीताई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' अशा घोषणा देत पदयात्रेचा थाटात प्रारंभ झाला. यावेळी प्रिती बंड मोठ्या मताधिक्याने विधानसभेत जातील असा विश्वास देखील महिला व नागरिकांनी व्यक्त केला. बडनेरा मतदार संघातील जनतेचा मोठ्या प्रमाणात जनसंपर्क मिळत आहे. पदयात्रेचा समारोपीय कार्यक्रम महाजनपुरा येथील संत गजानन महाराज मंदिर येथे करण्यात आला. यावेळी राजू चव्हाण, हेमंत विजयकर, मोहन पटके, संजय धानोरकर, श्याम बोरकर, छत्रपती चव्हाण, वासुदेव सावरकर, लकी विजयकर, प्रविण ठाकुर, रवींद्र उज्जैनकर, अनिल सावरकर, नरेंद्र रावेकर, अरविंद सावरकर, रामदास प्रधाने, विनोद कोठेकर, दीपक विजयकर, प्रवीण सावरकर, रामाजी उज्जैनकर, रवी सावरकर, नरेश सावळे, दिनेश विजयकर, पिंटू अनासे, मुकुंद देशमुख, प्रशांत आठवले, सागर वाटकर, विकी वाटकर त्यांच्यासह शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साईनगरमध्येही जबरदस्त प्रतिसाद



प्रिती बंड यांनी मंगळवारी(दि.5) साईबाबांचे दर्शन घेवून साईनगर परिसरात आपल्या पदयात्रेला सुरवात केली. यावेळी येथील जनतेने त्यांना जबरदस्त प्रतिसाद देत, विजयाचा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण केला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# घोडेराव कुटुंबाचा विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार

## मुलीच्या कथीत हत्या प्रकरणात न्याय मिळत नसल्याने घरावर लावले फलक

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.6 )** - सासरच्या लोकांनी आपल्या मुलीची निर्घृण हत्या केल्याचा आरोप करित आपल्याला न्याय मिळत नसल्याने येथील घोडेराव कुटूंबियांनी विधानसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकला आहे. त्यांनी अशा बहिष्काराचे फलक त्यांनी आपल्या घरावरसुध्दा लावले आहे.







साहेबराव घोडेराव यांची लहान मुलगी ऋुजा विपीन कट्यारमल हीचे लग्न दि.13 जून 2023 रोजी दत्तापूर धामणगाव येथील विपीन वासुदेवराव कट्यारमल ह्याचे सोबत दर्यापूर येथे झाले. लग्नानंतर तिच्या सासरच्या लोकांनी तिला चांगली वागणूक दिली. त्यानंतर घरातील सर्व लोकांनी तिला काही ना काही कारणावरून त्रास देणे सुरू केले. ‘तु तुझ्या आई-वडीलांकडून चारचाकी गाडी घेण्याकरीता पैसे आण! असा तीच्या मागे तिचा पती विपीन, सासरा वासुदेव, सासू ज्योती, व देर कुणाल कट्यारमल, मोठे सासरे हरिभाऊ कट्यारमल, मोठा भासरा योगेश कट्यारमल, लहान देर चेतन कट्यारमल या सर्व लोकांनी तिला मानसिक, शारिरिक व आर्थिक त्रास देवून दि. 8 ऑक्टोबर 2024 रोजी अंदाजे मध्यरात्री 1 ते 3 च्या दरम्यान दत्तापूर धामणगाव येथे राहत्या घरी कुटाराच्या खोलीमध्ये तिला जाळले. घोडेराव कुटूंबिय जेव्हा तिला यवतमाळ येथे हॉस्पीटल मध्ये पाहण्याकरीता गेलो त्यावेळेस ती मृत अवस्थेत होती. घटनास्थळावर पाहील्यावर तिची अत्यंत क्रुरतेने हत्या केल्याचे आढळले. असे असताना पोलिसांपासून ते नेत्यांपर्यंत सर्वांचे उंबरठे झिजविल्यानंतरही कुणीच घोडेराव कुटूंबियांना न्याय मिळाल्याने, या देशातील शासन, प्रशासन, न्याय पालिकेवरचा विश्वास उडाला आहे, त्यामूळे या कुटूंबियांनी येत्या 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकला आहे. आपल्या घराबाहेर फलक लावून तशी घोषणा ऋुजाची आई कमल घोडेराव, वडील साहेबराव घोडेराव व बहिणीने केली आहे. या प्रकारामुळे ऐन निवडणूकीमध्ये मत मागायला जाणाऱ्या नेत्यांची चांगलीच गोची झाली असल्याचे पहायला मिळत आहे.

# संसर्गजन्य तापीने फणफणतोय ग्रामस्थ

## गावागावात सर्दी, ताप, खोकला अंगदुखीचे रुग्ण

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.6 )**- गावागावात संसर्गजन्य तापीचे रुग्ण आढळत आहेत. सर्दी, ताप, खोकला, अंगदुखीने ग्रामीण भागातील जनता त्रस्त झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून रात्री ग्रामीण भागात अचानक हलकी थंडी पडायला सुरवात झाली आहे. तर दिवसा उन्हं तापत असल्याने वातावरणात संसर्गजन्य आजाराने जोर पकडला आहे.

आजारी पडल्यानंतर अनेक लोक पॅरासिटामोलचा वापर करतात डोकेदुखी असो किंवा हलका ताप असल्यास लोक त्यासाठी क्रोसीन व डोलो यासारखी पॅरासिटामोल औषधी घेतात. मात्र अनेक लोकांना त्यांचे अचूक प्रणाम माहिती नसते तज्ञांनी सांगितले की, पॅरासिटामोलमध्ये स्टिरॉइडस असतात, त्यामुळे चुकीचा डोस जिवावर बेतु शकतो. पॅरासिटामोल चुकीच्या वापरामुळे हृद्यविकाराचा धोका यकृत आणि किडणी खराब होण्याचा धोका अतिसार जास्त घाम येणे भुक न लागणे अस्वस्थता उलट्या ओटीपोटात दुखणे गोळा येणे वेदना अँलर्जी त्वचेवर पुरळ येणे रक्ताचे विकार, अश्या समस्या उदभवित आहेत. लहरी



> ताप आल्यास 3 दिवस पॅरासिटामोल औषध घेऊनही ताप उतरत नसेल तर, त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा वेदना होत असताना 10 दिवसांपेक्षा जास्त काळ पॅरासिटामोल घेऊ नये लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
>
> **डॉ.साहेबलाल धुर्वे,**
> **वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय,चुरणी.**

> वातावरणात झालेल्या बदलामुळे लोकांना सर्दी, ताप, खोकला अंगदुखी हात, पाय दुखणे आणि इतर प्रकारचे आजार दिसुन येत आहे. नागरिकांनी डाक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे झाले आहे. नागरिकांनी आरोग्य विषयी स्वतःची काळजी घ्यावी.
>
> **डॉ. राकेश अलोकार,**
> **वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ.**

हवामानामुळे लोकांना आजारांनी घेरले आहे, सर्दी खोकला ताप पडसे अंगदुखी हात, पाय दुखणे आणि डोकेदुखीच्या रुग्णांनी रुग्णालयात गर्दी होत आहे. मात्र गरिबांना शासकीय रुग्णालया शिवाय पर्याय नसल्याने ते ग्रामीण रुग्णालयात जात आहे. सर्व साधारण दररोज 78 ते 183 होणारी ग्रामीण रुग्णालयाची ओपीडी आता 111 वर गेली आहे.

मात्र मागील काही दिवसात ही रुग्णसंख्या झपाट्याने वाढली आहे. सर्दी, ताप, खोकला अंगदुखीचे रुग्ण वाढत असल्याने ग्रामीण रुग्णालयात ओपीडी 217 ते 195 रुग्णसंख्याची नोंद होत आहे. परंतु ग्रामीण भागात अंगदुखी ताप, सर्दी, खोकला या लक्षणांनी घरोघरी रुग्ण आजारी पडत आहेत. घरातील एक सदस्य आजारी पडला की आठवड्याभरात घरातील सर्वच आजारी पडत असल्याचेही दिसून येत आहे.

# टाकलेला विश्वास व्यर्थ जाऊ देणार नाही - डॉ निलेश विश्वकर्मा

## लोणी टाकळीमध्ये प्रचंड प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.6 )**- शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेले सोयाबीन अवकाळी पावसामूळे वाया गेले, जे सोयाबीन वाचले त्याला कवडीमोल भाव मिळत आहे. लाडकी बहीण योजनेत पैसे वाटल्यापेक्षा शेतकऱ्याच्या पिकाला दामदुप्पट भाव दिला तर शेतकरी कुटूंब तसेच सुखी होती. निवडणूकीपुरती आलेली ही लाडकी बहीण योजना अत्यंत फसवी आहे. उलट या योजनेमुळे महागाईने कळस गाठला आहे. या सरकारला जाब विचारण्याकरिता तुमचा प्रतिनिधी म्हणून मला आमदार बनवून विधानसभेत पाठवा, तुम्ही टाकलेला विश्वास व्यर्थ जाऊ देणार नाही, असे आश्वासन धामणगाव रेल्वे मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारीवर उभे असलेले डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी दिले. मतदारसंघातील



लोणी टाकळी येथे आयोजित प्रचारसभेमध्ये जनतेला संबोधित करताना ते बोलत होते.


वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांची प्रचार रॅली लोणी सर्कलमध्ये पोहोचल्यावर प्रमुख येथील चौकात त्यांच्यावर जेसीबी ने फुलांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी लोणी टाकळी येथील असंख्य नागरिक उपस्थित होते. तसेच संपूर्ण गावातून प्रचार रॅली काढण्यात आली. यानंतर येथील विठ्ठल मंदिरात जाहिर सभा घेण्यात आली. डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी आपल्या भाषणामध्ये महायुती व महाविकास आघाडीवर चांगलाच घणाघात केला. राज्यसरकारने एकीकडे लाडकी बहीण योजना आणली, दुसरीकडे जीएसटी वाढविला आणि सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावली. राज्यातले मोठे उद्योग गुजरातमध्ये गेले, ज्यामूळे 2 लाख युवक आणि युवतींवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. जिल्ह्यात गुन्हेगारी ने कळस गाठला आहे. मतदारसंघातील तिन्ही कृषी उत्पन्न बाजार समिती सत्ताधारी व विरोधकांकडे आहे. त्यामुळे कुठलाच विकास झालेला नाही. पीक विम्याचा एक छदामही शेतकऱ्यांना मिळाला नाही. त्यामुळे आजी-माजी आमदारांना घरी बसविण्याचे आवाहन यावेळी विश्वकर्मा यांनी केले. सभेला यावेळी मोठ्याप्रमाणात गावकरी उपस्थित होते.

# उमेशचंद्र ढोक याचे मरणोत्तर देहदान

## कुटूंबियांना मृत्यूपुर्वीच सांगितला आपला संकल्प

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.6 )**- येथील स्टेट ब ?क आ ?फ इंडीयाचे सेवा निवृत्त शाखाधिकारी उमेशचंद्र ढोक यांचे नुकतेच अल्पशाआजाराने निधन झाले. त्यांची ओळख ढोकसाहेब या नावाने होती. ते चळवळीतले तथा अंधश्रद्धानिर्मुलन समीतीच्या विचारसरणीचे पाईक होते. तसेच आधुनिक पुरोगामी विचारांचे कृतीशील प्रचारक होते. वऱ्हाडी कविवर्य विठ्ठल वाघ, हास्यकवी डॉ.मिर्झा बेग यांचे निकटच्या मैत्रीपुर्ण संबधातुन ते सामाजिक उपक्रम राबवित होते. वयाच्या 80 व्या वर्षी मृत्युची चाहुल लागण्यापुर्वीच त्यांनी आपल्या उशिखाली परीवारास संबोधीत करत देहदानाचा संकल्प लिहुन ठेवला होता. त्यांच्या इच्छेनुसार काल (दि.7) अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज येथे देहदान करण्यात



आले. यावेळी सर्व सोपस्कारांना फाटा देत श्रध्दांजलीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सांहेबांचा मित्र परीवार, नातेवाईकांनी अंत्ययात्रेत सहभागी होवून पारंपरिक विचारांना फाटा देत पुरोगामी विचारांचे आचरण केले. अंत्यवीधी व देहदानाचे संकल्पास पत्नी उर्मीला ढोक, मुलगा उपेंद्र ढोक, सुन मेघा ढोक, नातु परेश, मुलगी डॉ.उज्वला टांक, जावाई राजेंद्र टांक, डॉ.यश टांक, मिहीर टांक व अनिसचे कार्यकर्त्यांचे, सहकार्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने खासगी इलेक्ट्रिशियनचा मृत्यू

**अमरावती** - शेतशिवारात विद्युत वाहिनीवर काम करीत असताना वीज प्रवाहाचा धक्का लागल्याने खासगी इलेक्ट्रिशियनचा मृत्यू झाला. परवेज अहमद शेख रशीद (34 रा.चौसाळा, अंजनगाव सुर्जी) असे मृताचे नाव आहे. ही घटना 5 नोव्हेंबर रोजी सकाळी 10ः30 वाजता दरम्यान अंजनगाव सुर्जी परिसरातील खिराडा शेतशिवारात घडली. परवेज अहमद हा खिराडा शेत शिवारातील विद्युत लाईन चालू करण्यासाठी एमएसईबीच्या कर्मचारी यांच्यासोबत गेला होता. दरम्यान त्याला विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का लागला. त्यानंतर त्याला अंजनगाव सुर्जी उप रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते. तेथून त्याला परतवाडा व अचलपूर रेफर करण्यात आले. परंतू प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला अमरावती रेफर करण्यात आले. त्यानंतर त्याला डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटलमध्ये औषध उपचारासाठी नेण्यात आले. परंतू त्याचा सायंकाळी 6 वाजताच्या दरम्यान मृत्यू झाला. त्याचा मृतदेह पोस्टमार्टम करण्यासाठी रात्री 11ः45 वाजता जिल्हा सामान्य रुग्णालयात ठेवण्यात आला.

# आणखी एका व्यक्तीकडून 6 लाख 37 हजाराची रोख जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची वरुड परिसरात कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 6 नोव्हेंबर रोजी वरुड परिसरात कारवाई करित आणखी एका व्यक्तीकडून 6 लाख 37 हजाराची रोख जप्त केली. संबंधित व्यक्ती हा नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील रहिवासी असून, त्याच्याकडील दस्तावेज तपासणीनंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

6 नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नियमित गस्तीवर असतांना,



त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम हा पैसे घेऊन जात आहे. या माहितीवरून पोलिसांनी वरुड येथे एका इसमाची तपासणी केली असता, त्याच्याजवळ 6 लाख 37 हजार रुपयांची रोख मिळून आली. पोलिसांनी सदर व्यक्तीस रकमेबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे पोलिसांनी सदर रक्कम जप्त केली. पोलिस चौकशीनंतर संबंधित व्यक्ती हा काटोल येथील रहिवासी असल्याचे आढळून आले आहे. पोलिस त्याच्याकडील रोख रक्कमे संबंधात असणारे पुरावे तपासून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार यांच्या पथकाने केली.

# सातनूर शेतशिवारात विद्युत पंप चोरीच्या घटनेत वाढ

## पोलिसात तक्रार दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.6 )** - शेंदुरजना घाट पोलीस स्टेशन अंतर्गत सातनूर येथील परिसरात शेतातील विद्युत पंप चोरीच्या घटनेत वाढ झाल्याचे अजय शेंडे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून दिसून येत आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू आहे.

प्राप्त माहितीनुसार, नुकताच पावसाळा संपला असून हिवाळा या ऋुला सुरुवात झालेली आहे. शेतामध्ये खरिपाचे पीक असून त्या पिकाला पाण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे शेतकरी विहिरीतील पाणी विद्युत पंपाद्वारे पिकाला देण्यासाठी रात्री अपरात्री शेतामध्ये जात असतात, तरीही शेतकऱ्यांच्या



हातावर तुरी देऊन अज्ञात चोरटे शेतकऱ्यांच्या विद्युत पंप चोरून नेत आहेत. सातनूर येथील शेतकरी अजय शेंडे यांच्या शेतातील सोलर विद्युत पंप व केबल जवळपास 32 हजार 500 रुपये किमतीचा माल चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना सोमवार (दि.4) ला घडली, या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये अज्ञात चोरट्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. शेताला पाणी देण्याच्या वेळेतच विद्युत पंप चोरी होत असल्यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. या संकटाला दूर करण्यासाठी पोलिसांनी अज्ञात चोरट्याचा शोध घेऊन शेतकऱ्यांचे साहित्य शेतकऱ्यांना परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा सातनूर परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. या घटनेची तक्रार अजय शेंडे यांनी शेंदूरजनाघाट पोलिसात दिल्यामुळे पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बडनेरा मतदारसंघात रस्त्याचे तीनतेरा

## भानखेड ते उदखेड, अऱ्हाड -कुऱ्हाड ते अंजनगाव बारी मार्ग झाला जीवघेणा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.6 )**- निष्क्रीय लोकप्रतिनिधींमूळे बडनेरा मतदार संघातील अंतर्गत रस्त्यांचे तीनतेरा वाजलेले आहे. ज्यामूळे हे रस्ते आता येथील ग्रामस्थांना जीवावर उठले आहे. भानखेड ( बु.) ते उदखेड व अऱ्हाड-कुऱ्हाड ते अंजनगाव बारी हे मार्ग अनेक वर्षांपासून नुतणीकरणाच्या प्रतिक्षेत असुन यापैकी भानखेडा (बु.) ते उतखेड हा मार्ग गेल्या पाच वर्षांपासून मोठमोठे खड्डे पडलेले आहे. अऱ्हाड-कुऱ्हाड ते अंजनगाव बारी हा 2 कि.मी. एवढा मार्ग वगळता उर्वरित मार्गाची खड्ड्यांनी चाळणी झाली आहे.

भानखेडा बु. ते उदखेड हा मार्ग सा.बा.विभागाने गेल्या पाच वर्षांआधी डांबरीकरण केला होता. यावेळी या मार्गाचे काम होत असताना कमीत कमी मटेरियल व डांबराच्या जागी जास्तीत जास्त ऑईलचा वापर करून या मार्गाची निर्माण करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. ज्यामुळे अवघ्या काही दिवसात हा मार्गाची दुर्दशा



झाली. आता या मार्गाने वाहन चालकांना वाहन चालवणे कठीण झाले आहे. रात्रीच्या वेळी वाहन चालवताना अपघात होऊन बऱ्याच लोकांवर अपंग होण्याची वेळ आली आहे.



अऱ्हाड-कुऱ्हाड ते अंजनगाव बारी मार्गावर अऱ्हाड-कुऱ्हाड वरून अंजनगाव बारीकडे 2 कि.मी मार्गाचे डांबरीकरण झाले असुन उर्वरीत मार्ग हा पुर्णपणे कच्चा आहे. अऱ्हाड-कुऱ्हाड येथील नागरिकांची प्रमुख बाजारपेठ अंजनगाव बारी असुन गेल्या कित्येक वर्षांपासून दोन्ही गावातील नागरिक व शेतकऱ्यांनी हा मार्ग व्हावा म्हणून शासनाकडे मागणी रेटून धरली आहे. तेव्हा हा मार्ग होत असताना वनविभागाच्या क्षेत्रातून जाणाऱ्या या मार्गाबाबत राज्य शासन व केंद्र शासनामध्ये वाद निर्माण झाला आहे. हा मार्ग झाल्यास अऱ्हाड-कुऱ्हाड व अंजनगाव बारी ही गावे जोडली जाणार असुन अऱ्हाड-कुऱ्हाड गावाला अंजनगाव बारी अतिशय जवळ पडणार असुन अंजनगाव बारी हे अऱ्हाड-कुऱ्हाड येथील नागरिकांची बाजारपेठ होणार आहे. तसेच या मार्गावर दोन्ही गावातील शेतकऱ्यांच्या शेती असुन शेतकऱ्यांना शेतमालाची व मजूरांची ने-आण करण्यास सुलभ जाणार आहे. बडनेरा मतदार संघाचे आमदार रवी राणा यांनी याकडे जातीने लक्ष देऊन दोन्ही मार्गाचे काम सा.बा.विभाग व वनविभाग यांच्याशी संघर्ष करुन दोन्ही मार्गाचे बांधकाम त्वरीत सुरूवात करावी असे मत भानखेडा (बु.), उदखेड, अऱ्हाड-कुऱ्हाड व अंजनगाव बारी येथील नागरिकांनी व्यक्त केले आहे.

# शिवसेना प्रमूख उद्धव ठाकरे यांची आज बडनेरात महासभा

## मविआ उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**- बडनेरा विधानसभा मतदार संघात शिवसेनेच्या उमेदवारीवर रिंगणात असलेले महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार सुनिल खराटे यांच्या प्रचारार्थ शिवसेना प्रमूख उध्दव ठाकरे यांच्या महासभेचे उद्या गुरुवार (7 नोव्हे.) रोजी आयोजन करण्यात आले आहे. ही उध्दव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीतील पहिलीच सभा असून या सभेमुळे बडनेरा मतदार संघातील शिवसैनिकांमध्ये कमालीचा उत्साह संचारला आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव



ठाकरे यांची ही सभा दुपारी 4 वाजता जुनी वस्ती बडनेरा येथील आठवडी बाजार प्रांगण येथे होणार आहे. विशाल जाहीर सभेद्वारा शिवसैनिक आणि मतदारांना साद घालणार आहे. उद्धव ठाकरे हे विदर्भातील प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत. उध्दव ठाकरे यांच्यावर नेहमी गरड ओकणाऱ्या राणा दाम्पत्याविरोधात उध्दव ठाकरे काय बोलतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उध्दव ठाकरे यांची सभेने मतदारसंघातील महाविकास आघाडीला आणखीन बळकटी मिळेल असा विश्वास शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना वाटत आहे. सुनील खराटे यांना निवडून देण्यासाठी उध्दव ठाकरे मतदारांना साद घालणार आहे. जाहीर सभेला सर्वसामान्य मतदार ,शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पार्टी ,आप,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) व अन्य घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उमेदवार सुनील खराटे यांच्याकडून करण्यात आले आहे.